# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ, नागपूर यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम-२००५ च्या कलम १८ अन्वये दाखल तक्रार

**क्रमांक-तक्रार-१४६/२०२५** दिनांक : ०१ एप्रिल, २०२६

१. श्री. कैलास रामभाऊ गर्गेलवार, -- **तक्रारदार**
रा. महादेव मंदिराचे समोरासमोर,श्री. त्रिंबक स्वामी मंदिराजवळ,
विठ्ठल मंदिर वार्ड, चंद्रपूर-४४२४०२

२. जन माहिती अधिकारी तथा शहर अभियंता,
पाणी पुरवठा विभाग, चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर --**जन माहिती अधिकारी**

३. प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त, --**प्रथम अपिलीय अधिकारी**
चंद्रपूर महानगरपालिका, चंद्रपूर, ता. जि. चंद्रपूर

तक्रारदार यांनी माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ च्या कलम १८ नुसार आयोगास दिनांक ०५.०४.२०२५ रोजी (प्राप्त दिनांक ०९.०४.२०२५) थेट तक्रार अर्ज सादर केला आहे. या तक्रार अर्जा मध्ये तक्रारदार यांनी “ माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील नियम ३ नुसार माहिती मिळविण्याच्या अधिकारानुसार व कलम ६(१) नुसार विनंती अर्ज दाखल केला असता ३० दिवस पूर्ण होऊनही माहिती न मिळाल्याने जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचेवर कलम २०(१) व २०(२) अन्वये दंडाची व शिस्तभंगाची कार्यवाही करुन भरपाई मिळण्याबाबत.” असे कारण नमूद करुन थेट तक्रार अर्ज दाखल केला आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मध्ये जन माहिती अधिकारी यांच्या निर्णयाने व्यथित झालेल्या अर्जदारास दाद मागण्याकरिता खालीलप्रमाणे कार्यपध्दती विहीत करण्यात आली आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम -२००५ च्या कलम १९ (१) अन्वये ज्या कोणत्याही व्यक्तीला कलम ७ चे पोटकलम (१) किंवा पोटकलम (३) चा खंड (क) यामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या वेळेत निर्णय प्राप्त झाला नसेल, किंवा यथस्थिती केंद्रीय जन माहिती अधिकारी किंवा राज्य जन माहिती अधिकारी यांच्या निर्णयाने जी व्यक्ती व्यथित झालेली असेल अशा कोणत्याही व्यक्तीला अशी मुदत संपल्यापासून किंवा असा निर्णय प्राप्त झाल्यापासून तीस दिवसांच्या आत प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणांमधील यथास्थिती केंद्रीय जन माहिती अधिकारी किंवा राज्य जन माहिती अधिकारी यांच्यापेक्षा वरिष्ठ दर्जाच्या अशा अधिकाऱ्याकडे अपील करता येईल.

माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ च्या कलम १९(६) अन्वये पोटकलम (१) किंवा पोटकलम (२) अन्वये केलेले अपील, ते मिळाल्याच्या दिनांकापासून यथास्थिती तीस दिवसांच्या आत किंवा ते दाखल केल्याच्या दिनांकापासून एकूण पंचेचाळीस दिवसांपेक्षा अधिक होणार नाही अशा वाढविलेल्या कालावधीच्या आत, कारणे लेखी नमूद करुन, निकालात काढण्यात येईल.

माहितीचा अधिकार अधिनियम -२००५ च्या कलम १९(३) अन्वये पोटकलम (१) खालील निर्णया विरुध्दचे दुसरे अपील, ज्या दिनांकास निर्णय द्यायला हवा होता किंवा प्रत्यक्षात मिळाला होता त्या दिनांकापासून नव्वद दिवसांच्या आत, केंद्रीय माहिती आयोगाकडे किंवा राज्य माहिती आयोगाकडे दाखल करता येईल.

मा. सर्वोच्च न्यायालय यांनी Chief Information Commissioner -Vs- State of Manipur (AIR २०१२ SC ८६४), यामध्ये सिव्हिल अपील क्रमांक १०७८७-१०७८८/२०११ या याचिकेवर, दिनांक १२.१२.२०११ रोजी दिलेल्या आदेशामध्ये – The nature of the power under Section १८ is supervisory in character whereas the procedure under Section १९ is an appellate procedure and a person who is aggrieved by refusal in receiving the information which he has sought for can only seek redress in the manner provided in the stature, namely, by following the procedure under Section १९. This Court is, therefore, of the opinion that Section ७ read with Section १९ provides a complete statutory mechanism to a person who is aggrieved by refusal to receive information. Such person has to get the information by following the aforesaid statutory provisions." असे स्पष्ट केले आहे.

मा. सर्वोच्च न्यायालय यांनी दिलेले आदेश (Judgment) लक्षात घेता असे स्पष्ट होते की, केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ मधील तरतुदीनुसार केलेल्या तक्रारी ऐवजी कलम ६ अंतर्गत केलेल्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराने व्यथीत झाल्यास, कलम १९ (१) नुसार प्रथम अपील व कलम १९(१) वरील निर्णय मान्य नसेल तर कलम १९(३) अन्वये व्दितीय अपील दाखल करणे क्रमप्राप्त ठरते.

तसेच ज्या माहिती अर्जाच्या संदर्भात कलम १९ (३) अन्वये आयोगास व्दितीय अपील सादर करण्यात आले आहे व ज्या अपील प्रकरणी आयोगाने पारित केलेल्या आदेशाची अंमलबजावणी झाली नाही, अशा प्रकरणी तक्रारदार यांनी कलम १८ अंतर्गत तक्रार दाखल करणे अपेक्षित आहे.

तक्रारदार यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या तक्रारीचे अवलोकन केले असता आयोगास असे निदर्शनास आले आहे की, तक्रारदार यांनी माहिती अधिकार अधिनियम-२००५ मधील कलम ६(१) अंतर्गत दिनांक ०८.१०.२०२४ रोजी संबंधित जन माहिती अधिकारी, चंद्रपूर शहर महानगर पालिका, चंद्रपूर यांचेकडे माहितीचा अर्ज दाखल केला. त्यानंतर तक्रारदार यांचे समाधान न झाल्याने प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त, चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर यांचेकडे दिनांक १२.११.२०२४ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ मधील कलम १९(१) अन्वये प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०५.१२.२०२४ रोजी सुनावणी घेवून " जन माहिती अधिकारी तथा शहर अभियंता, पाणी पुरवठा विभाग यांनी सदर प्रकरणात अपिलार्थीस १५ दिवसाचे मुदतीत अभिलेख पडताळणीची संधी द्यावी. पडताळणी नंतर त्यांना अपेक्षीत असलेली ५० प्रती पर्यंत माहिती विनामुल्य पुरविण्यात यावी व तसा अहवाल सादर करावा" असे नमूद करुन आदेश पारीत केले. तद्नंतर तक्रारदार यांनी "माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील नियम ३ नुसार माहिती मिळविण्याच्या अधिकारानुसार व कलम ६(१) नुसार विनंती अर्ज दाखल केला असता ३० दिवस पूर्ण होऊनही माहिती न मिळाल्याने जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचेवर कलम २०(१) व २०(२) अन्वये दंडाची व शिस्तभंगाची कार्यवाही करुन भरपाई मिळण्याबाबत" असे कारण नमूद करुन आयोगाकडे कलम १८ (१) अन्वये थेट तक्रार अर्ज दाखल केला आहे. यावरुन असे दिसून येते की, तक्रारदार यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) नुसार आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले नाही. त्यामुळे तक्रारदार यांनी कलम १९ (३) अंतर्गत उपलब्ध असलेल्या संपूर्ण वैधानिक कार्यप्रणालीचा अवलंब न करता कलम १८ चा वापर केला आहे.

तक्रारदार यांची कलम १९(३) अंतर्गत कार्यप्रणालीचा अवलंब न करता अशा पध्दतीने तक्रार दाखल करण्याची कृती मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार विसंगत ठरते.

तथापि, तक्रारकर्ता यांच्या दिनांक ०९.०४.२०२५ रोजीच्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने आयोगाने जन माहिती अधिकारी तथा शहर अभियंता, पाणी पुरवठा विभाग, चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर व प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त, चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर यांना पत्र क्र. रामाआ/त.क्र. १४६/२०२५/तक्रार शाखा/२६७५, दिनांक ३०.०५.२०२५ अन्वये तक्रारदार यांच्या दिनांक ०८.१०.२०२४ रोजीच्या माहिती अर्जासंदर्भात केलेल्या

कार्यवाहीचा अहवाल आयोगास सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते. त्यानुषंगाने जन माहिती अधिकारी तथा शहर अभियंता, पाणी पुरवठा विभाग, चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर यांनी दिनांक १३.०६.२०२५ च्या पत्रान्वये (प्राप्त दिनांक १७.०६.२०२५) आयोगास अहवाल सादर करुन त्यामध्ये, "श्री. कैलास रामभाऊ गर्गेलवार यांनी दिनांक ०८.१०.२०२४ ला कार्यालयास माहिती अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत अर्ज सादर केला, परंतु प्रत्यक्षात पाणी पुरवठा विभागास दिनांक ०९.१०.२०२४ ला अर्ज प्राप्त झाला. परंतु विधानसभा सार्वत्रीक निवडणूक २०२४ ची प्रक्रिया दिनांक १५.१०.२०२४ पासून (आचारसंहिता) सुरु झाल्याने त्या कामात मनपाचे अधिकारी/कर्मचारी व्यस्त असल्याने व पाणी पुरवठा ही अत्यावश्यक सेवा असल्यामुळे योजनेवरील कामामध्ये व्यत्यय येऊ नये, त्याकरीता वेळेवर योजनेची कामे करणे अत्यंत गरजेचे असल्यामुळे माहिती विहीत कालावधीत देता आली नाही. त्यामुळे अर्जदारास माहिती पुरविण्यास विलंब झालेला आहे. तरी अर्जदारास कार्यालयीन अभिलेखात उपलब्ध असलेली माहिती पुरविण्यात आलेली आहे. सोबत अर्जदाराने माहिती अधिकार अंतर्गत केलेले अर्ज व अर्जदारास पुरविण्यात आलेल्या पत्र क्र. चंशमनपा/पापुवि/२०२४/१३६, दि. २८.११.२०२४ अन्वये माहिती पुरविण्यात आलेली आहे. तरी अर्जदाराची अपील खारीज करण्यात यावी, ही विनंती" असे नमूद केले आहे.

तसेच प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त, चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर यांनी दिनांक १६.०६.२०२५ च्या पत्रान्वये (आयोगास प्राप्त दिनांक २३.०६.२०२५) आयोगास अहवाल सादर केला असून त्यामध्ये 'तक्रारदाराने जोडपत्र-ब मध्ये दिनांक १२.११.२०२४ रोजी दाखल केली. त्यानुसार प्रथम अपील क्र. ७६/२०२४ ची सुनावणी दिनांक ०५.१२.२०२४ रोजी घेण्यात आली. जन माहिती अधिकारी तथा शहर अभियंता, पाणी पुरवठा विभाग यांनी सदर प्रकरणात अपिलार्थीस १५ दिवसाचे मुदतीत अभिलेख पडताळणीची संधी द्यावी. पडताळणी नंतर त्यांना अपेक्षीत असलेली ५० प्रति पर्यंत माहिती विनामुल्य पुरविण्यात यावी व तसा अहवाल सादर करावा, असा आदेश पारीत केला आहे.

महादेय, अर्जदाराचे मागणीप्रमाणे अपूरी माहिती मिळाली असल्यास अर्जदारास वेळ ठरवून अभिलेख पाहण्याची संधी देवून पाहिजे असलेली माहिती विनामुल्य देण्याची या कार्यालयाची भुमिका आहे. तरी सदर अपील खारीज करण्यात यावी, अशी विनंती आहे.' असे नमुद केले आहे.

सबब, जन माहिती अधिकारी तथा शहर अभियंता, पाणी पुरवठा विभाग, चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर यांनी तक्रारकर्ता यांना जोडपत्र-अ च्या अनुषंगाने माहितीबाबत कळविले आहे.

वरील वस्तुस्थिती विचारात घेता मा. सर्वोच्च न्यायालय यांनी सिव्हिल अपील क्र. १०७८७-१०७८८/२०११ या याचिकेवर दिलेले आदेशानुसार तक्रारदार यांनी कलम १८ अंतर्गत केलेल्या तक्रार अर्जावर कार्यवाही करण्याची आवश्यकता नाही. या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

## आदेश

प्रस्तुत तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

(गजानन निमदेव)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नागपूर

ठिकाण : नागपूर
दिनांक: ०१.०४.२०२६

जा.क्र. २६४४ दि. 7 APR 2026

E:\SD \तक्रार शाखा\थेट तक्रारआदेश – गर्गेलवार